महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मका/ग्रंथालय/२०१७-१८/८९

दूरध्वनी क्र.- ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५
फॅक्स क्र. – ०२२-४२२१००१९
ई-मेल - pro.mlwb-mh@gov.n

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार
क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई

दिनांक – २/११/२०१७.

परिपत्रक :

विषय – पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजना

संदर्भ – १. मका/ग्रंथालय/१६-१७/११७ दि.३०.६.२०१६

२. विकाठा/ग्रंथालय/२०१७-१८/१७०५ दि. १२.१०.२०१७

संदर्भ क्र.१ नुसार, कामगारांच्या पाल्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके खरेदी रकमेच्या पन्नास टक्के रक्कम अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. संदर्भीय पत्र क्र.२ नुसार, सदर योजनेतील पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.३,००,०००/- (रु.तीन लाख) वरून रु.५,००,०००/- (रु.पाच लाख) करावी. तसेच केंद्रात अर्ज स्वीकारण्याची मुदत नोव्हेंबर अखेरपर्यंत वाढविण्यात अशी विनंती करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने चालू आर्थिक वर्षापासून कामगार पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.३,००,०००/- (रु.तीन लाख) वरून रु.५,००,०००/- (रु.पाच लाख) करण्यात येत आहे. सदर उत्पन्न मर्यादेतील वाढ पुढील आदेश निघेपर्यंत लागू राहील.

तसेच चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता अर्ज स्वीकारण्याची मुदत खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे. सदर मुदतवाढ फक्त चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता लागू राहील, याची नोंद घ्यावी. तसेच सन २०१८-१९ पासून संदर्भीय पत्र क्र.१ मध्ये नमूद कालमर्यादेचे पालन करण्यात यावे.

| अ.क्र. | तपशील | अंतिम मुदत | सुधारित अंतिम मुदत (सन २०१७-१८ करिता) |
|---|---|---|---|
| १. | केंद्रात अर्ज स्विकारणे | सप्टेंबर अखेरपर्यंत | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी गट कार्यालयात अर्ज पाठविणे | ऑक्टोंबरच्या दुस-या आठवड्यापर्यंत | डिसेंबर पहिल्या आठवड्यापर्यंत |
| ३. | गट कार्यालयांनी प्रस्ताव मंजूर करणे | ऑक्टोंबरअखेर पर्यंत | डिसेंबर अखेरपर्यंत |
| ४. | पात्र लाभार्थीच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे | नोव्हेंबरअखेर पर्यंत | जानेवारी दुस-या आठवड्यापर्यंत |

याव्यतिरिक्त उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ मधील इतर सर्व नियम व अटीं कायम ठेवण्यात येत आहेत.

प्र.कल्याण आयुक्त

# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

<u>परिपत्रक</u>

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५

फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९

ई-मेल : pro.mlwb-mh@gov.in

मका/ग्रंथालय/१६-१७/११७

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार

क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,

एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३

दिनांक – ३० जून २०१६

<u>विषय :- पाठ्यपुस्तक सहाय्य योजना</u>

मंडळाच्या पाठ्यपुस्तक सहाय्य योजनेंतर्गत कामगार पाल्यांना क्रमिक पाठयपुस्तके खरेदी रकमेच्या ५० टक्के रक्कम अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. <u>चालू आर्थिक वर्षापासून पात्र लाभार्थींना धनादेशाद्वारे रक्कम अदा न करता त्यांच्या **बँक खात्यात रक्कम ऑनलाईन जमा करण्यात येईल.**</u>

लाभार्थींच्या बँक खात्यात रक्कम ऑनलाईन जमा करण्याची कार्यवाही गट कार्यालयांनी करावयाची आहे. विभागीय कार्यालयांनी मंडळाच्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अधिन राहून समान न्यायाच्या तत्वाने गटांना निधी वाटप करावा. सदर योजनेसाठी खालील कालमर्यादेचा अवलंब करावा.

| अ.क्र. | तपशिल | अंतिम मुदत |
|---|---|---|
| १. | केंद्रांत अर्ज स्वीकारणे | सप्टेंबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी गट कार्यालयात अर्ज पाठविणे | ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत |
| ३. | गट कार्यालयांनी प्रस्ताव मंजूर करणे | ऑक्टोबर अखेरपर्यंत |
| ४. | पात्र लाभार्थींच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे. | नोव्हेंबर अखेरपर्यंत |

<u>नियम व अटी</u> :-

१. लाभार्थी "महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३" च्या कक्षेत येणारे कामगार कुटुंबीय असले पाहिजेत.

२. पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाखांच्या आत असले पाहिजे.

३. इयत्ता ११ वी पासून पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जाईल. यात तांत्रिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांचा देखील समावेश आहे.

४. ए.टी.के.टी.विद्यार्थ्यांनाही योजनेचा लाभ दिला जाईल.

५. दहावीनंतर अभियांत्रिकी (डिप्लोमा) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.२५००/- पर्यंत अर्थसहाय्य दिले जाईल. तसेच बारावीनंतर अभियांत्रिकी (डीग्री कोर्स) व वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील रु.२५००/- पर्यंत अर्थसहाय्य दिले जाईल. इतर अभ्यासक्रमासाठी रु.१५००/- पर्यंत अर्थसहाय्य दिले जाईल.

६. अर्जदाराने पुस्तकांची खरेदी करुन मंडळात बिल सादर करावे.

७. शिष्यवृत्ती रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यात ऑनलाईन जमा होणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वत:चे (किंवा पालकासह संयुक्त) खाते बँकेत असणे बंधनकारक आहे. **सदर बँक खाते विद्यार्थ्याने त्याच्या आधार क्रमांकाशी लिंक करुन घ्यावे.**

८. अर्जदाराने आपल्या घराजवळील कामगार कल्याण केंद्रातच अर्ज जमा करावा.

९. विद्यार्थीनी दाखले/प्रमाणपत्रे यांच्या छायांकित प्रती स्वयं साक्षांकीत केल्या तरी ग्राह्य असतील. त्यासाठी सोबतच्या नमुन्याप्रमाणे स्वयं घोषणापत्र जोडावे. अथवा सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकीत केलेली कागदपत्रे जोडावीत.

१०. पात्र व अपात्र अर्जदारांची यादी केंद्र / गट व विभागीय कार्यालयात नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात यावी. त्याची प्रत माहितीस्तव मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी.

---

**अर्जासोबत जोडावयाचे दाखले (झेरॉक्स) :-**

१. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी कपात झाल्याचा उल्लेख असलेली पालकाची (वडील/आई) जून महिन्याची पगार पावती **किंवा** आस्थापनेचा दाखला.

२. गतवर्षाचे गुणपत्रक.

३. विद्यार्थ्याचे आधार कार्ड.

४. सोबत पालकाचे आधारकार्ड **किंवा** ई.एस.आय.सी. **किंवा** रेशनकार्ड जोडावे.

५. क्रमिक पाठ्यपुस्तक खरेदीचे **मूळ बिल** जोडावे. (गाईड्स, संदर्भग्रंथ इ. वगळता)

६. बँक खाते क्रमांक, बँकेचा मायकर क्रमांक व आय.एफ.एस.सी.क्रमांक यांची नोंद असलेला बँकेचा कॅन्सल चेक (रद्द चेक) किंवा पासबुकची झेरॉक्स.

**महत्वाच्या सूचना :**

- आस्थापनेच्या दाखल्यावर जून महिन्याच्या वेतनाचे विवरण असावे. त्यावर अधिकाऱ्याची सही व आस्थापनेचा शिक्का असावा.
- पुस्तक खरेदीचे बिल छापील असावे. त्यावर बिल क्रमांक असावा किंवा व्हॅट क्रमांक असावा. या व्यतिरिक्त इतर कोणतीही पावती वैध मानली जाणार नाही. बिलावर विद्यार्थ्याचे पूर्ण नाव असावे.

- अर्जात नमूद क्रमानुसार पुस्तकांची नावे असावीत. अंकी व अक्षरी किंमत बरोबर असावी. अर्जात व पावतीवर लिहिलेल्या पुस्तकांची रक्कम सारखी असावी. एकूण बेरीज बरोबर असावी.
- मूळ अर्जावर प्राचार्यांचे पदनाम शिक्क्यासह सही असावी.
- कागदपत्रावरील विद्यार्थ्यांचे नाव सारखे असावे. त्यात जराही बदल नसावा, खाडाखोड नसावी.
- अर्ज दोन प्रतीत जमा करावा. एक मूळ संच व दुसरा झेरॉक्स संच.

सदर परिपत्रक पुढील आदेश निघेपर्यंत लागू राहील.

सोबत : अर्जाचा नमुना.

Jadhav
कल्याण आयुक्त

प्रत:-

१) सर्व विभाग प्रमुख, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) सहाय्यक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३) सहाय्यक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
४) कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
५) सर्व केंद्र प्रमुख व ग्रंथालयीन कर्मचारी
६) डॉकेट फाईल

टीप – गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रांना परिपत्रक निर्गमित करावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

पाठ्यपुस्तक सहाय्यता योजना अर्ज

| कार्यालयीन उपयोगाकरिता | | |
|---|---|---|
| केंद्रांचे नाव | सभासद क्र. व दिनांक | इयत्ता |
| | | |
| ५० टक्के अर्थसहाय्य रक्कम : | | |

विद्यार्थ्याचे नाव : ………………………………………………………………

बँकेचे नाव व शाखा : ………………………………………………………………

बँक खाते क्रमांक : ………………………………………………………………

आय.एफ.एस.सी.क्रमांक : ………………………………… मायकर क्रमांक : ……………………

विद्यार्थ्याचा आधार कार्ड क्र. : ………………………………… मोबाईल क्रमांक : ……………………

| अ.क्र | क्रमिक पाठ्यपुस्तकांचे नाव | लेखकाचे नाव | प्रकाशन वर्ष | किंमत (रु) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| | | | **एकूण रक्कम** | |

विद्यार्थ्यांची सही :

दिनांक :

## महाविद्यालय प्रमुखाचा दाखला

कुमार/कुमारी ……………………………………………………………………

आमच्या विद्यालय/महाविद्यालयात इयत्ता ……………………………… मध्ये शिकत असून सन २०………… साठी वर नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे क्रमिक पाठ्यपुस्तकांची आवश्यकता आहे.

**प्राचार्यांची सही व शिक्का**